**महाराष्ट्र शासन**
**वित्त विभाग**
**संचालनालय, लेखा व कोषागारे,**
**मुंबई पोर्ट ट्रस्ट, ठाकरसी हाऊस, तिसरा मजला,**
**जे. एन. हेरेडिया, बॅलार्ड इस्टेट, फोर्ट, मुंबई - ४०० ००१.**
ईमेल - ad.admin@mahakosh.in
संकेतस्थळ :- www.mahakosh.in

क्र.संलेको/०६-२०१९/प्रशा-राप-सलेअ/टिस-२/वैखप्र/अधि.सुधारणा/417 दिनांक : 26 JUN 2019

**विषय - शासकीय कर्मचाऱ्यांच्या वैद्यकीय खर्चाच्या प्रतिपुर्तीच्या मंजुरीच्या अधिकारांत सुधारणा करण्याबाबत.**
**संदर्भ - सार्वजनिक आरोग्य विभाग शा.नि.क्र.वैखप्र-२०१८/प्र.क्र.४८८/२०१८/राकावि-२, दि. ०६/०६/२०१९.**

महाराष्ट्र राज्य सेवा (वैद्यकीय देखभाल) नियम - १९६१ व त्यानंतर वेळोवेळी निर्गमित करण्यात आलेल्या शासन निर्णयांमधील तरतुदींनुसार संचालनालयाच्या अधिनस्त असलेल्या सर्व अधिकारी व कर्मचारी यांची खाजगी रुग्णालयातील वैद्यकीय खर्चाच्या प्रतिपुर्तीची सर्व देयके मंजुरीकरीता विभाग प्रमुख म्हणुन या कार्यालयास सादर केली जातात.

उपरोक्त संदर्भिय शासन निर्णयान्वये महाराष्ट्र राज्य सेवा (वैद्यकीय देखभाल) नियम - १९६१ व त्यानंतर वेळोवेळी निर्गमित केलेल्या शासन निर्णयामधील तरतुदींच्या अधीन राहून खाजगी रुग्णालयातील वैद्यकीय खर्चाच्या प्रतिपुर्ती देयकांना मंजुरी देण्याच्या वित्तीय अधिकारात खालीलप्रमाणे बदल करण्यात आला आहे.

| अ.क्र. | सक्षम प्राधिकारी | पूर्वीचे अधिकारी | सुधारीत अधिकार |
|---|---|---|---|
| १ | मंत्रालयीन प्रशासकीय विभाग प्रमुख | रुपये ३,००,०००/- (अक्षरी रुपये तीन लक्ष) वरील प्रकरणे | रुपये ३,००,०००/- (अक्षरी रुपये तीन लक्ष) वरील प्रकरणे |
| २ | विभाग प्रमुख | रुपये ३,००,०००/- (अक्षरी रुपये तीन लक्ष) पर्यंत | रुपये २,००,०००/- (अक्षरी रुपये दोन लक्ष) वरील परंतु रुपये ३,००,०००/- (अक्षरी रुपये तीन लक्ष) पर्यंतची प्रकरणे |
| ३ | प्रादेशिक विभाग प्रमुख | निरंक | रुपये २,००,०००/- (अक्षरी रुपये दोन लक्ष) पर्यंतची प्रकरणे |

प्रादेशिक विभाग प्रमुख म्हणुन, सर्व सहसंचालक, सहसंचालक कार्यालय, लेखा व कोषागारे यांना त्यांच्या कार्यालयातील तसेच अधिनस्त असलेल्या सर्व कोषागार कार्यालयातील अधिकारी/कर्मचाऱ्यांची तसेच अधिदान व लेखा अधिकारी, अधिदान व लेखा कार्यालय, मुंबई यांना अधिदान व लेखा कार्यालयातील अधिकारी/कर्मचाऱ्यांच्या रुपये २,००,०००/- (अक्षरी रुपये दोन लक्ष) पर्यंतच्या वैद्यकीय खर्चाच्या प्रतिपुर्तीस मंजुरी देता येईल.

वैद्यकीय खर्चाच्या प्रत्येक प्रकरणी रुपये ३,००,०००/- (अक्षरी रुपये तीन लक्ष) च्या कमाल मर्यादेत, प्रतिपुर्तीस मंजूरी देण्याचे अधिकार विभाग प्रमुख म्हणून संचालक, लेखा व कोषागारे यांना आहेत. तरी यापुढे सर्व सहसंचालक व अधिदान व लेखा अधिकारी यांनी रुपये २,००,०००/- (अक्षरी रुपये दोन लक्ष) वरील वैद्यकीय खर्चाच्या प्रतिपुर्तीचे प्रत्येक प्रकरण मंजूरीसाठी संचालनालयास सादर करावे.

राज्याबाहेरील रुग्णालयातील वैद्यकीय खर्चाच्या प्रतिपुर्तीची प्रकरणे, विशेष बाब म्हणुन मंजुरी दयावयाची प्रकरणे तसेच शासनाकडे मंजुरीसाठी पाठवावयाची प्रकरणे पुर्वीप्रमाणेच संचालनालयास सादर करावीत.

राज्य अभिलेख देखभाल अभिकरण, मुंबई व आभासी कोषागार कार्यालय, मुंबई यांनी त्यांच्या कार्यालयातील अधिकारी/कर्मचारी यांची वैद्यकीय खर्च प्रतिपूर्तीची सर्व प्रकरणे पुर्वीप्रमाणेच संचालनालयात सादर करावीत.

सर्व सहसंचालक, लेखा व कोषागारे यांनी प्रादेशिक विभाग प्रमुख म्हणून वैद्यकीय खर्चाच्या प्रतिपुर्तीस मंजुरी देताना, महाराष्ट्र राज्य सेवा (वैद्यकीय देखभाल) नियम - १९६१ व त्यानंतर वेळोवेळी निर्गमित करण्यात आलेल्या शासन निर्णयांमधील तरतुदीच्या अनुषंगाने काटेकोरपणे तपासून मंजुरी दयावी.

संचालनालयाने यापुर्वी आक्षेप लावुन सहसंचालक कार्यालयांना व अधिदान व लेखा कार्यालयास परत केलेली रुपये २,००,०००/- (अक्षरी रुपये दोन लक्ष) च्या मर्यादेतील वैद्यकीय खर्चाच्या प्रतिपुर्तीच्या प्रकरणी, त्रुटींची पुर्तता करुन घेऊन त्याच स्तरावरुन मंजुरी देण्यात यावी.

संदर्भिय शासन निर्णय प्रलंबित प्रकरणांनाही लागु असल्याने संचालनालयात मंजूरीसाठी प्रलंबित असलेली सर्व प्रकरणे संबंधित सहसंचालक कार्यालयांना व अधिदान व लेखा कार्यालयास परत करणे आवश्यक आहे. तरी सर्व सहसंचालक/अधिदान व लेखा अधिकारी यांनी त्यांच्या प्राधिकृत प्रतिनिधीस संचालनालयास पाठवुन त्यांची वैद्यकीय खर्चाच्या प्रतिपुर्तीची प्रकरणे प्राप्त करुन घ्यावीत. सदरील देयके कार्यालयास प्राप्त झाल्यानंतर त्यांचा प्राधान्याने निपटारा करावा.

**(ज. र. मेनन)**
**संचालक, लेखा व कोषागारे,**
**महाराष्ट्र राज्य, मुंबई.**

प्रत :

१. सहसंचालक, सहसंचालक कार्यालय, लेखा व कोषागारे, कोकण/पुणे/नाशिक/नागपूर/औरंगाबाद/अमरावती.
२. अधिदान व लेखा अधिकारी, अधिदान व लेखा कार्यालय, मुंबई.
३. उपसंचालक, राज्य अभिलेख देखभाल अभिकरण, मुंबई.
४. कोषागार अधिकारी, कोषागार कार्यालय (सर्व).
५. सहाय्यक संचालक, आभासी कोषागार कार्यालय, मुंबई.
६. निवड नस्ती.